RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-अ

वर्ष १२, अंक ८९ (५)] मंगळवार, जुलै १४, २०२६/आषाढ २३, शके १९४८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक ३०४

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

अल्पसंख्याक विकास विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक १४ जुलै, २०२६.

अधिसूचना

एकात्मिक वक्फ व्यवस्थापन, सक्षमीकरण आणि विकास अधिनियम, १९९५.

क्रमांक वक्फ २०२०/प्र.क्र.६९/कार्यासन-४.— ज्याअर्थी, वक्फ अधिनियम, १९९५ (१९९५ चा ४३ वा) च्या कलम ८३ च्या पोट-कलम (१) व (४) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा व यासंबंधी प्राप्त असलेल्या इतर सर्व शक्तींचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने, शासन अधिसूचना, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र. वक्फ २०१५/प्र.क्र.१४२/कार्यासन-४, दिनांक १ ऑगस्ट २०१७ (यापुढे "उक्त अधिसूचना" असे संबोधण्यात येईल), अन्वये, एखाद्या वक्फ किंवा वक्फ मालमत्तेशी संबंधित विवाद, प्रश्न व इतर संबंधित बाबींचे निर्धारण करण्यासाठी, एखाद्या भाडेकरूचे निष्कासन किंवा अशा मालमत्ता संदर्भातील भाडेपट्टाकार व भाडेपट्टादार यांच्या अधिकारांचे व बंधनांचे (Obligation) निर्धारण उक्त अधिनियमांतर्गत करण्यासाठी, संपूर्ण महाराष्ट्र राज्यावर अधिकारिता असलेले, महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबाद (यापुढे "उक्त न्यायाधिकरण" असे संबोधण्यात येईल) ची स्थापना केली आहे;

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने, शासन अधिसूचना, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र. वक्फ/२०२०/ प्र.क्र.६९/ कार्यासन-४, दिनांक ४ जून, २०२४ अन्वये श्री.आदिल मुश्ताक अहमद खान, जिल्हा न्यायाधिश-१ आणि अतिरिक्त सत्र न्यायाधिश, गोंदिया यांची उक्त न्यायाधिकरणावर अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आलेली होती;

आणि ज्याअर्थी, श्री.आदिल मुश्ताक अहमद खान यांची बदली होत असल्याने मा. मुंबई उच्च न्यायालयाने त्यांच्या जागी श्री. वाय. एम. एच. खराडी, न्यायाधिश, शहर दिवाणी न्यायाधिश, दिडोंशी, मुंबई यांच्या नावाची उक्त न्यायाधिकरणावर अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यासाठी शिफारस केली आहे.

त्याअर्थी, एकात्मिक वक्फ व्यवस्थापन, सक्षमीकरण आणि विकास अधिनियम, १९९५ (१९९५ चा ४३ वा) च्या कलम ८३ च्या उप-कलम (४) मधील खंड (अ) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा व यासंबंधी प्राप्त असलेल्या इतर सर्व शक्तींचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे श्री. वाय. एम. एच. खराडी यांची उक्त न्यायाधिकरणावर अध्यक्ष म्हणून नियुक्ती करत आहे, आणि त्या उद्दिष्टाकरिता उक्त अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

उक्त अधिसूचनेसोबतच्या तक्त्यामध्ये अनुक्रमांक १ मध्ये रकाना क्रमांक २ "नाव" या शिर्षकाखाली "श्री. आदिल मुश्ताक अहमद खान" या शब्दांऐवजी "श्री. वाय. एम. एच. खराडी" या शब्दांचा समावेश करण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

डॉ. माधवी खोडे चवरे,
शासनाचे सचिव.

MINORITIES DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 14th July 2026.

NOTIFICATION

UNIFIED WAQF MANAGEMENT, EMPOWERMENT, EFFICIENCY AND DEVELOPMENT ACT, 1995.

No.Waqf 2020/C.R.69/Desk-4.— Whereas, in exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*4*) of section 83 of the Waqf Act, 1995 (43 of 1995) and of all other powers enabling it in that behalf; the Government of Maharashtra *vide* Government Notification, Minorities Development Department, No.Waqf-2015/C.R.142/Desk-4, dated the 1st August 2017 (hereinafter referred to as "the said Notification"), has constituted the Maharashtra State Waqf Tribunal at Aurangabad, (hearinafter referred to as "the said Tribunal") for the determination of any dispute, question or other matter relating to a waqf or waqf property, eviction of a tenant or determination of rights and obligations of the lessor and the lessee of such property, under the said Act, having jurisdiction over whole of the State of Maharashtra ;

And whereas, the State of Maharashtra has, *vide* Government Notification, Minorities Development Department, No. Waqf/ 2020/C.R.69/Desk-4, dated the 4th June 2024, appointed Shri Adil Mushtaque Ahmad Khan, District Judge-I and Additional Sessions Judge, Gondia, as a Chairman of the said Tribunal ;

And whereas the Hon'ble High Court of Judicature at Bombay has now recommended the name of Shri Y. M. H. Kharadi, Judge City Civil and Additional Sessions Judge, Dindoshi, Mumbai for appointment as a Chairman of the said Tribunal, in place of Shri Adil Mushtaque Ahmad Khan who is under order of transfer.

Now therefore, in exercise of the powers conferred by clause (*a*) of sub-section (*4*) of section 83 of the Unified Waqf Management, Empowerment, and Development Act, 1995 (43 of 1995) and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby appoints Shri Y. M. H. Kharadi, Judge City Civil and Additional Sessions Judge, Dindoshi, Mumbai, as a Chairman of the said Tribunal, and for that purpose amends the said Notification as follows :—

In Table appended to the said Notification, in Serial No.1, in column (2), under the heading "Name", for the words "Shri Adil Mushtaque Ahmad Khan" the words "Shri Y. M. H. Kharadi" shall be substituted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DR. MADHAVI KHODE CHAWARE,
Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.